महाराष्ट्र पोलीस

लोहमार्ग मुंबई

महाराष्ट्र शासन
पोलीस आयुक्त कार्यालय, लोहमार्ग मुंबई.

पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई एरिया मॅनेजर बिल्डींग पी.डी.मेलो मार्ग, वाडीबंदर मुंबई. ४०००-१०
Email ID :- sb1mumrly@gmail.com दुरध्वनी क्र. :- ०२२-२३७५९२८३

क्र.पोआलो/प्रलि-आस्था/पोलीस भरती-२०२१/२०२३/८० दिनांक :- २/०३/ २०२३

**-: पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई भरती सन २०२१ :-**

**मैदानी चाचणी उमेदवारांचा निकाल**

लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील ६२० रिक्त पदांकरिता पोलीस शिपाई भरती सन २०२१ मैदानी चाचणी दि.१७.०१.२०२३ ते २१.२.२०२३ या कालावधीत लोहमार्ग पोलीस मुख्यालय घाटकोपर, पतंनगर, घाटकोपर मुंबई येथे पार पडली. प्रतिदिन घेण्यात आलेल्या मैदानी चाचणीचा निकाल वेळोवेळी या घटकाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. उमेदवारांच्या शारिरीक चाचणीचे गुण उमेदवारांना दाखवून त्यांची स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. तसेच शारिरीक चाचणीचे संगणकीकृत गुणपत्रकाची दिनांकनिहाय यादी रोजच्या रोज पोलीस आयुक्त कार्यालय लोहमार्ग मुंबई यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मैदानी चाचणी करिता पात्र झालेल्या उमेदवारांचे गुणपत्रक आज दि.२.३.२०२३ रोजी लोहमार्ग मुंबई पोलीस संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर गुणपत्रकातील उमेदवारांचे नांव, सामाजिक आरक्षण (Category), समांतर आरक्षण (Horizontal Reservation), जन्मतारीख (Date of Birth) शिक्षण (Education) गुण (Total Ground Marks) व N.C.C. इत्यादीबाबत काही तफावत आढळल्यास त्या **दिनांक ६.३.२०२३ रोजीचे १८.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या rcmumrly@gmail.com या ईमेलवर कळवाव्यात**. सदर बाब कळविताना त्यांनी स्वत:चे संपुर्ण नांव, आवेदन अर्ज क्रमांक, चेस्ट क्रमांक, मोबाईल क्रमांक इत्यादी तपशिल ईमेल मध्ये नमूद करावा. मुदतीनंतर प्राप्त झालेले हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच सद्यस्थितीत उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पुर्नपडताळणी सुरु असून कागदपत्र/प्रमाणपत्रांमध्ये काही त्रुटी आढळून आल्यास उमेदवाराची निवड उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर तात्काळ रद्द करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखून ठेवण्यात येत आहेत.

२/३

**(डॉ.सदिप भाजीभाकरे)**
पोलीस भरती अध्यक्ष तथा
पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ,
लोहमार्ग मुंबई.

**ठिकाण** : लोहमार्ग मुंबई

**दिनांक** : २.३.२०२३